| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा क्र. ३२/२०२५ मधील निशाणी क्रमांक २३ खालील आदेश** (CNR No. **MHWS**050002302025 ) |

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचेतर्फे त्यांना त्यांचा लेखी जबाब/ म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळण्यासाठी दिला आहे.

२) सदरचा अर्ज वाचला. त्यास वादीच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. प्रतिवादी क्र. २ ते ४ तर्फे विधिज्ञ श्री. व्ही.ए.बेलोकार यांचा आणि वादीतर्फे विधीज्ञ श्री. एन.एम.मुळे यांचा युक्तिवाद ऐकला.

३) प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचे विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्र. २ ते ४ हे जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांचे अधिकारी आहेत. परंतू त्यांना कार्यालयीन कागदपत्रे वेळेवर न मिळाल्यामुळे ते त्यांचा लेखी जबाब मुदतीत दाखल करु शकले नाहीत. तरी प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात यावा आणि प्रस्तुतच्या अर्जासोबत दाखल केलेला प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात यावा.

४) याउलट वादी यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी जाणीवपुर्वक विहीत मुदतीत त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५) अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्र. २ ते ४ निशाणी क्र. १२ ते १७ नुसार दिनांक १९.५.२०२५,६.५.२०२५ आणि २९.४.२०२५ रोजी या दाव्याचे समन्स मिळालेले आहे परंतू कायदेशीर मुदतीत त्यांनी त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला नाही.

६) दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ मधील आदेश ८ नियम १ नुसार दाव्याचे समन्स मिळाल्यापासून जास्तीत जास्त ९० दिवसांच्या आत प्रतिवादीने त्यांचा लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे. या दाव्याचे समन्स प्रतिवादी क्र. ४ यांना दिनांक २९.४.२०२५ रोजी मिळालेले आहे आणि प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचेतर्फे प्रस्तुतचा अर्ज दिनांक १४.८.२०२५ रोजी दिलेला आहे. उपरोक्त दोन्ही तारखा विचारात घेतल्या तर प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास १५ दिवसांचा विलंब झालेला आहे असे दिसून येते.

७) हे सर्वज्ञात आहे की, कोणताही दावा गुणदोषावर निकाली निघणे आवश्यक आहे. त्यासाठी दोन्हीही पक्षकारांना पुरेशी संधी मिळणे गरजेचे आहे. वादीने प्रतिवादींविरुध्द प्रस्तुतचा दावा जाहिर ठरावासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचा लेखी जबाब

अभिलेखावर आला तर प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली करण्यास तो उपयुक्त ठरु शकतो. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचा उपरोक्त युक्तीवाद विचारात घेतला तर त्यांनी जाणीवपूर्वक लेखी जबाब दाखल करण्यास विलंब केला आहे असे वाटत नाही. त्यामुळे उपरोक्त सर्व परिस्थिती विचारात घेऊन नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने व प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली निघण्यासाठी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## आदेश

प्रस्तुतचा अर्ज नि. २३ हा मंजूर करण्यात येत आहे. तसेच प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास झालेला १५ दिवसांचा विलंब माफ करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2025.09.20 17:13:50 +0530

स्थळ :मंगरुळपीर
दिनांक : २०/०९/२०२५.

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R.Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>Civil Judge Senior Division,<br>Mangrulpir. |
| Date of Decision | : | 20.9.2025 |
| Order signed by the P.O. on | : | 20.9.2025 |
| Order Uploaded on | : | 20.9.2025 |